**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून, अधिवेशनात सर्व विधेयकांवर चर्चा करण्याची, तसंच विरोधी पक्षांना बोलण्याची संधी देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही
- राज्यात महिला आणि मुलींची सुरक्षितता धोक्यात आल्याचा काँग्रेसचा आरोप/ गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची केली मागणी
- निवडणूक आयोग यापुढं पात्र मतदारांना एकमेव एपिक क्रमांक देणार
- विदर्भाची तिसऱ्यांदा रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या जेतेपदाला गवसणी

  **आणि**
- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत अखेरच्या साखळी सामन्यात भारताचं न्यूझीलंडपुढं विजयासाठी २५० धावांचं आव्हान

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरु होत आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाला सुरुवात होईल.  राज्याचा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प १० मार्च रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडला जाईल.

**<><><><><>**

अधिवेशनात सर्व विधेयकांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी असून विरोधी पक्षांना बोलण्याची संधी दिली जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित

वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. आपल्याकडे एखादी बातमी आली तरी दुसऱ्याबाजू सहित ती बातमी प्रकाशित करावी, असी विनंतीही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी माध्यमांना केली. छत्रपती शिवाजी महाराज हे आपलं आराध्य दैवत असून त्यांच्याविरोधात बोलणाऱ्यांविरोधात निश्चित कारवाई केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

अधिवेशनात विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याची आपली तयारी असून बहुमताच्या जोरावर कामकाज रेटणार नाही, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. अलिखित प्रथेप्रमाणे विरोधकांनी चहापानाला न येण्याचा निर्णय घेतला, अशी टीका पवार यांनी केली. महायुतीला विधानसभा निवडणुकीत भरघोस मतदान मिळालं असून यामुळे विरोधी पक्षनेता होऊ शकणार नाही, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. महायुती सरकारच्या मागच्या कार्यकाळात वेगाने काम केलं असून महाविकास आघाडी सरकारने बंद पाडलेले प्रकल्प पुन्हा सुरू केले असं शिंदे म्हणाले. विकासाचा हा वेग या कार्यकाळात वाढेल असा विश्वास त्व्यक्त करत  याचं प्रतिबिंब या अर्थसंकल्पात पडलेलं दिसेल, असं शिंदे म्हणाले.

**<><><><><>**

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुंख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात संवाद असावा, मात्र फक्त चहापानाला जाऊन संवाद होत नसतो, असं महाविकास आघाडीच्या वार्ताहर परिषदेत विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितलं.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना शिक्षा झाल्यामुळे त्यांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी दानवे यांनी केली. पुण्यातल्या बलात्कार प्रकरणी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचं वक्तव्य असंवेदशील असून त्यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नाही, असंही ते म्हणाले. सत्ताधारी विरोधकांना सापत्न वागणूक देत आहे, विरोधी पक्षातल्या लोकांना खोट्या गुन्ह्यात अडकवत आहे, इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणारा प्रकाश कोरटकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणारे राहुल सोलापूरकर यांना सरकार पाठीशी घालत आहे, असा आरोपही त्यांनी केला. मुंबईतली अनेक महत्वाची कार्यालयं बाहेर नेऊन मुंबईचं महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे, राज्यावर आठ लाख कोटी रुपयांचं कर्ज आहे, हे सरकार शेतकरी, युवक यांच्या विरोधात आहे, अशी टीका दानवे यांनी केलं.

निवडणूका आल्या की सत्ताधाऱ्यांना पक्षांना शिवाजी महाराज, शाहू फुले आंबेडकर आठवतात, मात्र त्यांचा अवमान करणाऱ्यांना महत्वाच्या पदावर बसवायचं हे सरकारचं धोरण आहे अशी टीका कॉंग्रेस नेते भाई जगताप यांनी केली.

केंद्रीय मंत्र्याच्या मुलीची छेड काढली जात असेल तर राज्यात दुसरं कोण सुरक्षित आहे असा प्रश्न राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी विचारला.

**<><><><><>**

केंद्रीय राज्य मंत्री रक्षा खडसे यांच्या कन्येची छेड काढल्याप्रकरणी मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. जळगाव जिल्ह्यातल्या

कोथळी गावात संत मुक्ताई यात्रेमधे हा प्रकार झाल्याचं खडसे यांनी सांगितलं. संबंधित आरोपीला ताबडतोब अटक करावी या मागणीसाठी भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येनं आज मुक्ताईनगर पोलीसठाण्यात जमले होते असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी या प्रकाराचा निषेध केला असून आयोगाचं यावर लक्ष असल्याचं सांगितलं.

राज्यात महिला आणि मुलींची सुरक्षितता धोक्यात असून गृहमंत्रीपद सांभाळणाऱ्या देवेंद्र फडनवीसांनी राजीनामा द्यावा, तसंच पोलीस महसंचालकपदावरुन रश्मी शुक्ला यांची हकालपट्टी करावी अशी मागणी काँग्रेसनं केली आहे. सुरक्षारक्षक सोबत असताना केंद्रीय मंत्र्यांच्या मुलीची छेड काढली जाते आणि आरोपीला अटक करावी या मागणीसाठी प्रत्यक्ष मंत्री रक्षा खडसे यांना पोलीसठाण्यात ठिय्या द्यावा लागतो यावरुन राज्यात कायदा सुव्यवस्था कोलमडल्याचं स्पष्ट होतं, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या सर्व पात्र मतदारांना एकमेव एपिक क्रमांक मिळावा, यासाठी निवडणूक आयोग काम करत आहे, अशी माहिती निवडणू आयोगानं दिली आहे. एकाच वेळी दोन मतदारांना एकच एपिक क्रमांक दिला, तरी त्यातून बनावट मतदार तयार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असं आयोगानं स्पष्ट केलं. दोन वेगळ्या राज्यांमधल्या दोन मतदारांना एकच एपिक क्रमांक दिला गेल्याचं वृत्त काही माध्यमांमधून पसरलं असल्याच्या पार्श्वभूमीवर आयोगाने हा खुलासा केला आहे. एकच एपिक क्रमांक असला तरी या मतदारांचं नाव

वेगळ्या राज्यात, वेगळ्या विधानसभा मतदारसंघात, आणि वेगवेगळ्या मतदान केंद्रावर नोंदलेलं आहे. यापूर्वी मतदार नोंदणीची प्रक्रीया विकेंद्रीत असल्याने असे क्रमांक दिले गेले असावे. मात्र यापुढं सर्व पात्र मतदारांना एकमेव एपिक क्रमांक मिळावा यासाठी निवडणूक आयोग काम करत आहे, असं आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

विदर्भ क्रिकेट संघानं आज रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचं जेतेपद तिसऱ्यांदा आपल्या नावे केलं. नागपूर इथं विदर्भ आणि केरळ यांच्यात झालेला अंतिम सामना आज अनिर्णित राहिला. मात्र विदर्भानं पहिल्या डावात केरळवर मिळवलेल्या ३७ धावांच्या आघाडीच्या जोरावर जेतेपदाला गवसणी घातली. आज सामन्याच्या अखेरच्या दिवशी विदर्भाच्या दुसऱ्या डावात ९ बाद ३७५ धावा झाल्या असताना, दोन्ही संघांनी सामना अनिर्णित राखण्यावर सहमती दर्शवली.

या सामन्यात पहिल्या डावात १५३, आणि दुसऱ्या डावात ७३ धावांची खेळी केलेल्या विदर्भच्या दानीश मालेवार सामनावीर ठरला..

विदर्भाच्याच हर्ष दुबे याला त्याच्या अष्टपैलू कामगिरीसाठी स्पर्धेतल्या सर्वोकृष्ट खेळाडुच्या किताबानं गौरवलं गेलं. त्यानं यंदाच्या रणजी हंगामात ६९ बळी टिपत, बिहारच्या आशुतोष अमन याचा एकाच हंगामातला सर्वाधिक ६८ बळींचा विक्रम मागे टाकला. यासोबतच त्यानं १० सामन्यांमध्ये पाच अर्धशतकांसह ४७६ धावाही काढल्या.

या संपूर्ण हंगामात विदर्भाचा संघ अपराजीत राहिला. त्यांनी १० पैकी ९ सामने जिंकले तर केवळ अंतिम सामना अनिर्णित राहिला. रणजी स्पर्धेचं

जेतेपद पटकावल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विदर्भाच्या संघाचं अभिनंदन केलं आहे. या विजयातून विदर्भानं निर्धार, कौशल्य आणि क्रिकेटमधल्या उत्कृष्टतेचे दर्शन घडवलं असं गडकरी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबई इथं सुरु असलेल्या अ गटातल्या सामन्यात भारतानं न्यूझीलंडसमोर विजयासाठी २५० धावांचं आव्हान ठेवलं आहे. हा या स्पर्धेतला अखेरचा साखळी सामना आहे. या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या भारताची सुरुवात डळमळीत झाली. शुभमन गील, रोहीत शर्मा आणि विराट कोहली हे भारताचे आघाडीचे फलंदाज केवळ ३० धावांमध्येच माघारी परतले. त्यानंतर श्रेयस अय्यर यानं आधी अक्सर पटेल याच्यासोबत ९८ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला. श्रेयसनं सर्वाधिक ७९ धावा केल्या, तर अक्सर यानं ४२ आणि हार्दिक पांड्या यानं ४५ धावांचं योगदान दिलं. न्यूझीलंडच्या वतीनं मॅट हेन्री यानं भारताचे ५ गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या ७ षटकात १  बाद २८ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

मुस्लिमांचा पवित्र महिना रमजानला आजपासून प्रारंभ झाला असून, त्यानिमित्त प्रार्थना प्रवचन अशा धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. रमजान महिन्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

सेबीच्या माजी अध्यक्ष माधवी पुरी-बुच आणि इतर पाच जणांविरुद्ध एफआयआर दाखल करायचे आदेश मुंबईच्या विशेष भ्रष्टाराविरोधी न्यायालयानं न्यायालयानं दिले आहेत. यात सेबीचे तीन अधिकारी आणि मुंबई शेअर बाजाराच्या दोन अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

विदर्भाचं पंढरपूर अशी ओळख असलेल्या धापेवाडा गावाचा पर्यटन आणि तीर्थस्थळाच्या दृष्टीने विकस होणार असल्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केली. त्यांच्या हस्ते नागपुरात धापेवाडा इथल्या विठ्ठल मंदिरातल्या १६४ कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं भूमिपूजन करण्यात आलं.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकण, मध्य महाराष्ट्र, आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं ३८ पूर्णांक ५ अंश सेल्सिअस, तर सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं १७ अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता तर तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**